MKCL
Creating a Knowledge Lit World
www.mkcl.org

MAHARASHTRA KNOWLEDGE CORPORATION LIMITED

CIN: U80302 PN2001 PLC135348 ISO 9001:2015 Company

संदर्भ क्रमांक: २०१९: MS-CIT: ०१
दिनांक: ०७ जुलै २०१९

**विषय: MS-CIT अभ्यासक्रम आता दोन पर्यायात: MS-CIT(Job Readiness) व MS-CIT (IT Awareness)**

**प्रिय MS-CIT ALC समन्वयक,**
**सप्रेम नमस्कार.**

गेल्या सुमारे दोन दशकात महाराष्ट्राच्या जनमानसामध्ये MS-CIT कोर्सची दर्जेदार **'IT AWARENESS'** अभ्यासक्रम अशी प्रतिमा दृढ करण्यात आपल्याला लक्षणीय यश मिळाले आहे ही अभिमानास्पद बाब आहे. आपण सर्वांनी प्रदीर्घ काळ एकदिलाने केलेल्या असामान्य अशा सामुहिक प्रयत्नाचे ते फलित आहे. शालेय विद्यार्थी, सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिक किंवा गृहिणी अशांसारख्या समाज घटकांच्यादृष्टीने ही प्रतिमा आजही समर्पक आहे. त्यामुळे तिचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे.

पण बदलत्या काळानुसार शहरी व ग्रामीण भागातील युवा (युवक व युवती) विद्यार्थ्यांच्या अपेक्षा बदलत आहेत. त्यांना रोजगारक्षम बनवणारे नवनवीन अभ्यासक्रम तातडीने हवे आहेत. त्यामुळे आपण त्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे आपल्या व्यवसायाच्या दीर्घकालीन यशस्वी वाटचालीसाठी आवश्यक आहे. त्यादृष्टीने MS-CIT कोर्सची दर्जेदार **'JOB READINESS'** अभ्यासक्रम अर्थात युवांना रोजगारक्षम बनवणारा दर्जेदार अभ्यासक्रम अशीही नवी प्रतिमा निर्माण करण्याची व ती त्वरित आणि मोठ्या प्रमाणावर युवांमध्ये हिरिरीने रुजवण्याची गरज आहे.

स्वत:ची रोजगारक्षमता वाढविण्यासाठी IT कौशल्ये शिकू इच्छिणारे युवा अलिकडे नॉनव्हेकेशन काळात म्हणजेच जुलै ते मार्च या नऊ महिन्यांमध्ये बहुसंख्येने MS-CIT अभ्यासक्रमाला प्रवेश घेतात. त्यांची ही गरज लक्षात घेऊन नॉनव्हेकेशन काळात **'जॉब रेडीनेस'** हा MS-CIT चा परवलीचा शब्द (पासवर्ड) बनवावा लागेल. MS-CIT अभ्यासक्रमाचा आशय 'जॉब रेडिनेस'वर केंद्रित केल्यास आपल्या केंद्रात 'मिशन व्हेकेशन' इतके किंवा त्यापेक्षा अधिक MS-CIT प्रवेश **'मिशन नॉनव्हेकेशन'** अंतर्गतही दरवर्षी होऊ शकतील.

हे लक्षात घेऊन यापुढे MS-CIT अभ्यासक्रम आता खालील दोन पर्यायात जुलै २०१९ पासून (सप्टेंबर २०१९ Exam Event पासून) उपलब्ध करून देण्यात येत आहे:

**पर्याय १: MS-CIT (Job Readiness)** – IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना:

- पहिली नोकरी / स्वयंरोजगार मिळविण्यासाठी
- पुढची अधिक चांगली नोकरी / अधिक चांगला स्वयंरोजगार मिळविण्यासाठी
- अर्धवेळ नोकरी करून IT कौशल्यांवर आधारित जोडव्यवसाय करण्यासाठी
- IT कौशल्ये वापरून कंपनीची उत्पादकता व सेवेची गुणवत्ता वाढवून चालू नोकरीत प्रगती / पगारवाढ / बढतीसाठी

- आपल्या गावात राहून पूर्णवेळ ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी
- आपल्या गावात राहून नोकरी / घरकाम / व्यवसाय सांभाळून अर्धवेळ ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी
- आपल्या गावात राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करताना ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी
- आपल्या गावात राहून कनिष्ट / वरिष्ठ महाविद्यालयीन किंवा पॉलिटेक्निकमधील शिक्षण सांभाळून ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी

**पर्याय २: MS-CIT (IT Awareness)** – IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे:

- प्रामुख्याने शालेय विद्यार्थी
- शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य
- शासकीय/ निमशासकीय कर्मचारी व अधिकारी
- ज्येष्ठ नागरिक
- गृहिणी
- कुतूहलापोटी / मनोरंजनासाठी / आत्मसन्मानासाठी संगणक शिकू इच्छिणारे, इ.साठी

हे बदल सर्व ALCs ना व्यवस्थित समजावून सांगण्यासाठी व ते कसे आमलात आणावेत याचे मार्गदर्शन करण्यासाठी लवकरच ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. या प्रशिक्षण कार्यक्रमात आपल्या शंका व संभाव्य अडचणींचे निराकरण करण्यात येईल. तसेच या ऑनलाईन प्रशिक्षणादरम्यान MS-CIT चा 'जॉब रेडीनेस' व 'IT अवेअरनेस' आशय वाढवण्याच्या दिशेने आपल्या नाविन्यपूर्ण सूचनांचे संकलनही करण्यात येईल.

**MS-CIT ची नवी प्रवेश पद्धत:**

1. वर उल्लेखिलेल्या महत्वपूर्ण व्यावसायिक वृद्धीच्या उद्दिष्टासाठी MS-CITच्या प्रवेश पद्धतीत नाममात्र बदल करण्यात येत आहे.
2. सध्या सुरु असलेल्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांची माहिती BizClient मधून भरावी.
3. माहिती भरत असताना MS-CIT (Job Readiness) किंवा MS-CIT (IT Awareness) यापैकी योग्य पर्याय विद्यार्थ्यांच्या संमतीने निवडावा.
4. निवडलेला पर्याय नंतर बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी.
5. नेहमीच्या पद्धतीनुसार SOLAR मधून विद्यार्थी कन्फर्म करावे.
6. निवडलेल्या पर्यायानुसार विद्यार्थ्याला MS-CIT (Job Readiness) किंवा MS-CIT (IT Awareness) हा कोर्स 'इरा' लॉग इन मध्ये उपलब्ध होईल व त्यानुसार त्याला लर्निंग करता येईल.
7. वरील दोन पर्यायातील MS-CIT अभ्यासक्रमाचे प्रवेश BizClient मधून दिनांक १२ जुलै २०१९ रोजी सुरू होतील. तोपर्यंत सप्टेंबर २०१९ Exam Event साठी जुन्या MS-CIT अभ्यासक्रमाचे प्रवेश BizClient मधून चालू राहतील.
8. वरील दोन पर्यायातील MS-CIT अभ्यासक्रमाचे इरा मधील लर्निंग दिनक २५ जुलै २०१९ पासून सुरू होईल.
9. सप्टेंबर Exam Event मध्ये जुन्या MS-CIT अभ्यासक्रमाची तसेच दोन पर्यायातील नव्या MS-CIT अभ्यासक्रमाची परीक्षा घेण्यात येईल.

**MS-CIT चा नवीन इरा-कंटेंट:**

1. बहुतांश कंटेंट आपल्या ERA Server वर आहेच.
2. MS-CIT (Job Readiness) व MS-CIT (IT Awareness) या अभ्यासक्रमांसाठी लागणारा उर्वरित कंटेंट आपल्या SBU Coordinator च्या मदतीने Hard Disk मधून ERA Server वर आपण copy करून घ्यावा.

**MS-CIT ची नवी अभ्यास पद्धती:**

1. MS-CIT (Job Readiness) व MS-CIT (IT Awareness) या दोन्ही पर्यायांमध्ये एकूण ५० सेशन्स
2. प्रत्येक सेशन दोन तासांचे

3. पहिल्या ४० सेशन्समध्ये प्रत्येकी १ तास क्लासरूम व एक तास लॅब
4. पहिल्या ४० सेशन्समधील अभ्यासक्रम त्या त्या पर्यायाच्या सर्व विद्यार्थ्यांना समान

5. शेवटच्या १० सेशन्समध्ये प्रत्येक सेशनचे दोनही तास लॅबमध्येच पूर्ण करावे लागतील.
6. या १० सेशन्समधील एकूण २० तासांच्या लॅबमध्ये MS-CIT (Job Readiness) किंवा MS-CIT (IT Awareness) चे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या कौशल्यासंबंधीच्या २-२ तासांच्या इलेक्टिव सेशन्सद्वारे (ऐच्छिक सेशन्सद्वारे) इरा प्रणालीतून देण्यात येईल.

7. या नाविन्यपूर्ण व आकर्षक अशा इलेक्टिव सेशन्सची यादी आपणास लवकरच पाठवण्यात येईल.
8. विद्यार्थ्यांना त्या यादीतून त्यांच्या आवडीप्रमाणे इलेक्टिव सेशन्स निवडता येतील.

9. विद्यार्थ्यांनी अशी १० सेशन्स त्यांच्या आवडीप्रमाणे निवडून ती २० तासात पूर्ण करणे अपेक्षित आहे.
10. एकाद्या विद्यार्थ्याला इरातील या इ-कंटेंटच्या दुनियेत मुक्त-सफर करून अनेक रोजगारांची/करीयर्सची किंवा IT कौशल्यांची ओळख करून घेता येईल. पण गुण मिळवायचे असल्यास संबंधित सेशन पूर्ण करावे लागेल. विद्यार्थ्यांनी निवडलेले एकादे सेशन त्यांना पसंत न पडल्यास ते सेशन अर्ध्यावर सोडून विद्यार्थी दुसरे सेशन लगेच निवडू शकतात.

11. भविष्यात रोजगार क्षेत्रातील मागणीनुसार व तंत्रज्ञानातील अद्ययावत ट्रेंड्सनुसार नवनवीन इलेक्टिव सेशन्स सातत्याने उपलब्ध करून देण्यात येतील.
12. तसेच कालबाह्य होऊ घातलेली सेशन्स वेळोवेळी अभ्यासक्रमातून गाळण्यात येतील.

**MS-CIT नवी अंतर्गत मूल्यमापन पद्धती:**

1. MS-CIT च्या अंतर्गत मूल्यांकनासाठी ५० सेशन्समध्ये विचारण्यात येणारे प्रश्न सोडवून कमाल ५० गुण मिळविता येतील.
2. मात्र MS-CIT अंतिम ऑनलाईन परीक्षेला पात्र होण्यासाठी ५० सेशन्सपैकी पहिली ४० सेशन्स विहित मुदतीत पूर्ण करणे व त्यांच्या अंतर्गत मूल्यमापनात ४० पैकी किमान २० गुण मिळविणे बंधनकारक आहे.
3. पहिल्या ४० सेशन्समधील गुण हे विद्यार्थ्याने सोडवलेल्या ब्लू व रेड चॅलेंजेस व सेशन-एन्ड टेस्टनुसार देण्यात येतील.
4. मात्र अखेरच्या १० इलेक्टिव सेशन्सवरील सर्व गुण हे केवळ अचूक सोडवलेल्या रेड चॅलेंजेससाठी व सेशन-एन्ड टेस्टसाठी देण्यात येतील.
5. विद्यार्थ्यांनी निवडलेले इलेक्टिव सेशन पूर्ण शिकल्यास त्या सेशनमधील अचूक सोडवलेल्या रेड चॅलेंजेचे गुण त्यांना देण्यात येतील.
6. विद्यार्थ्यांनी निवडलेले इलेक्टिव सेशन पूर्ण न केल्यास ते सेशन व त्या सेशमधील अचूक सोडवलेल्या रेड चॅलेंजेसचे गुण ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**MS-CIT ची नवी अंतिम ऑनलाईन परीक्षा:**

1. अंतिम ऑनलाईन परीक्षेसाठी असलेल्या एकूण ५० गुणांसाठी पहिल्या ४० सेशन्समधील अभ्यासक्रमावरच प्रश्न विचारले जातील.
2. अखेरच्या १० सेशन्सवर अंतिम ऑनलाईन परीक्षेत प्रश्न विचारले जाणार नाहीत कारण निरनिराळ्या विद्यार्थ्यांनी अभ्यासलेली इलेक्टिव सेशन्स भिन्न असतील.

तुमच्या केंद्रामध्ये ‘मिशन नॉनव्हेकेशन’ अंतर्गत MS-CIT तसेच KLiC प्रवेशातील भरीव वाढीसाठी पुन्हा एकदा मनापासून शुभेच्छा देवून हे विशेष पत्र संपवितो.

आपला स्नेहांकित,

**विवेक सावंत**
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित

# Job Readiness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Getting First Job/ or becoming Self Employed

---

पहिली नोकरी / स्वयंरोजगार मिळविण्यासाठी

# Job Readiness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Getting the next better Job/Self Employment

---

पुढची अधिक चांगली नोकरी / अधिक चांगला स्वयंरोजगार मिळविण्यासाठी

# Job Readiness

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Working at University/ Colleges & Freelancing

---

आपल्या गावात राहून कनिष्ट / वरिष्ठ महाविद्यालयीन किंवा पॉलिटेक्निकमधील शिक्षण सांभाळून ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी

# Job Readiness

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



## Part Time Job with Freelancing

---

अर्धवेळ नोकरी करून IT कौशल्यांवर आधारित जोडव्यवसाय करण्यासाठी

# Job Readiness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



## Full Time Freelancing

---

आपल्या गावात राहून पूर्णवेळ
ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग
पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी

# Job Readiness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Increase in Job Performance & Companies Productivity

---

IT कौशल्ये वापरून
कंपनीची उत्पादकता व सेवेची गुणवत्ता
वाढवून चालू नोकरीत
प्रगती / पगारवाढ / बढतीसाठी

# Job Readiness

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Job/Business/Household Work
with Freelancing

---

आपल्या गावात राहून नोकरी
/ घरकाम / व्यवसाय सांभाळून
अर्धवेळ ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग
पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी

# Job Readiness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master Job Readiness and Self Employability in Digital Space

IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता (Employability) वाढवू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना



Preparation for Competitive Exams & Freelancing

---

आपल्या गावात राहून स्पर्धा परीक्षांची
तयारी करताना
ऑनलाईन ग्लोबल फ्रीलान्सिंग
पद्धतीच्या स्वयंरोजगारासाठी

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे



Homemakers

---

गृहिणी

# IT Awareness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे



Teachers

---

शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य

# IT Awareness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे



School Students

---

प्रामुख्याने शालेय विद्यार्थी

# IT Awareness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे




learning Computer for Self-esteem, Curiosity & Entertainment

---

कुतूहलापोटी / मनोरंजनासाठी / आत्मसन्मानासाठी संगणक शिकू इच्छिणारे, इ.साठी

# IT Awareness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे




Government & Semi Govt.
Employees and Officers

---

शासकीय/ निमशासकीय
कर्मचारी व अधिकारी

# IT Awareness

MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology

## To Master digital skills in fast growing IT World

IT कौशल्ये शिकून डिजिटल युगात आत्मविश्वासाने पुढे जावू इच्छिणारे



Senior Citizens

---

ज्येष्ठ नागरिक